# कृपया प्रसिध्दीसाठी

गोवा कला अकादमी आयोजित पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती पुरुष , महिला व बाल कलाकार भजनस्पर्धा जाहीर करण्यात आली असून सदर स्पर्धेच्या प्रवेशिका नियम व अटींसहित आदिलशाह पॅलेस, जुने सचिवालय, पणजी-गोवा येथील कला अकादमीच्या कार्यालयात बुधवार २१ जून २०२३ पासून विनामूल्य उपलब्ध असतील. इच्छुकांनी आपले पूर्ण भरलेले अर्ज दि. २८ जून २०२३ रोजी कार्यालयीन वेळेत सादर करावे.

कला अकादमीची ही स्पर्धा फक्त गोमंतकीय कलाकारांसाठीच असून भजनी कलाकारांना पुरुष, महिला किंवा बाल अशा कोणत्याही एकाच विभागातील पथकात सहभागी होता येईल. बाल कलाकारांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १६ वर्षे वयाची मर्यादा असून स्पर्धेची प्रवेशिका सादर करण्याच्या अंतिम दिवशी १६ वर्षाखालील कलाकारांना बाल कलाकार स्पर्धेत सहभागी होता येईल तसेच सदर दिवशी १६ वर्षे पूर्ण केलेल्या कलाकारास पुरुष/महिला भजन स्पर्धेतच सहभागी व्हावे लागेल.

तरी भजन स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भजन पथकांनी पुर्णरीत्या भरलेल्या आपल्या प्रवेशिका दि. २८ जून २०२३ पर्यंत कला अकादमीच्या कार्यालयात दाखल कराव्यात, त्यानंतर आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही असे अकादमीने कळविले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)

कार्यक्रम व विकास अधिकारी